वर्ष-०७ | अंक-२९ | मुंबई, मंगळवार ०८ ते १४ जून २०२१ | पृष्ठ-४

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 शिराळा एमआयडीसीला वादळाचा तडाखा; 6 जण जखमी

3 → यंदाचा लॉकडाउन ठरला 'भीषण'; अपघातांच्या संख्येत वाढ

मिरा भाईंदर महानगरपालिका ऑर्चिड हॉस्पिटल, स्वस्तिक आणि अपूर्वा लॅब यांच्यावर कारवाई. ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबईसह कोकणात चार दिवस अतिवृष्टी; हवामान खात्याचा इशारा



मुंबई महानगर क्षेत्रासह कोकणातल्या सर्व जिल्ह्यात ९ ते १२ जून या चार दिवसांच्या काळात अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे या चार दिवसाच्या काळात सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सज्ज आणि सतर्क राहून काम ...पान २ वर...

## फुड स्टॉलच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी भाजपा नगरसेविकेवर गुन्हा दाखल

गेल्या महिन्यात मालाड येथे फास्ट फूड स्टॉल कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याच्या आरोपांखाली बांगूर नगर पोलिसांनी शनिवारी भारतीय जनता पक्षाच्या एका नगरसेवकाविरूद्ध गुन्हा दाखल ...पान २ वर...

# खबरदारी घेऊन अर्थचक्र सुरू ठेवण्यावर भर!

**मुख्यमंत्र्यांनी सरकार घेत असलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने सहकार्य करावे, असे आवाहन निर्मात्यांना केले.**



मुंबई : राज्यात हळूहळू निर्बंध शिथिल करत आहोत. आता आपल्याला टाळेबंदीही टाळायची आहे आणि करोनामुळे लोक जायबंदी होणार नाहीत, याचीही काळजी घ्यायची आहे. त्यामुळे करोनाविषयक नियमांचे पालन करून- खबरदारी घेऊन उद्योग व मनोरंजन क्षेत्राचे अर्थचक्र सुरू राहावे. करोनाकाळातही उद्योग-व्यवसाय सुरू राहू शकतात, याचे उदाहरण देशासमोर ठेवायचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केले.

करोनाच्या टाळेबंदीसदृश निर्बंधांनंतर सोमवार, ७ जूनपासून राज्यात ठिकठिकाणी रुग्णसंख्येनुसार शिथिलीकरण करण्यात येत असल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी अर्थचक्र पुन्हा सुरू करण्याच्या दृष्टीने उद्योजक आणि मनोरंजन क्षेत्रातील नामवंतांच्या दोन स्वतंत्र बैठका घेतल्या. 'लॉकडाऊन'ही (टाळेबंदी) नको आणि करोनामुळे लोक 'नॉकडाऊन' (जायबंदी) झाले असेही व्हायला नको. त्यामुळे करोनाचे नियम पाळत राहा. आपण मर्यादित धोका पत्करून निर्बंध शिथिल करत आहोत. त्यासाठी काही निकष ठरवून वर्गवारी केली आहे. स्थानिक पातळीवर प्रशासन निर्बंध किती शिथिल करायचे याबाबत निर्णय घेईल, असे सांगत अर्थचक्र पुन्हा सुरू करण्याची राज्य सरकारची भूमिका असल्याचा संदेश मुख्यमंत्री ठाकरे यांनी दिला.

आता पुन्हा चित्रपट आणि मालिकांच्या चित्रीकरणाला परवानगी देण्यात आली आहे. मात्र, निर्मात्यांनी चित्रीकरणादरम्यान शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. चित्रीकरणासाठी सावधगिरी बाळगायची असून स्थानिक प्रशासनाने परवानगी दिल्यानंतर चित्रीकरण करता येईल. चित्रीकरणाशी संबंधित असलेले कलाकार, तंत्रज्ञ, इतर कर्मचाऱ्यांना जैव-सुरक्षा परिघातच (बायो-बबल) राहणे बंधनकारक असेल. तसेच अधिकाधिक कलाकारांचे लसीकरण करण्यावर भर देण्यात यावा, असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी सांगितले. या चर्चेमध्ये मुख्यमंत्र्यांनी सरकार घेत असलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने सहकार्य करावे, असे आवाहन निर्मात्यांना केले. त्यावर सरकार घेईल त्या निर्णयांना पाठिंबा असेल, असे आश्वासन ...पान २ वर...

## "सचिन वाझे आणि मुंबईतील नालेसफाई कनेक्शनची चौकशी करा"



"नालेसफाई करणाऱ्या कंत्राटदाराकडून पैसे वसूल करण्याची जबाबदारी सचिन वाझेवर होती," असा आरोप करत "त्यामुळे वाझे आणि नालेसफाईच्या कामातील कनेक्शनची चौकशी झाली पाहिजे," अशी मागणी भाजपाचे नेते आणि आमदार आशिष शेलार यांनी आज केली. आशिष शेलार यांनी काही दिवसांपूर्वीच मुंबईतील नालेसफाईच्या कामाबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर त्यांनी आज मुंबईतील नालेसफाईच्या कामाची पाहणी केली. नालेसफाईच्या पाहणीनंतर बोलताना आशिष शेलार म्हणाले, "सचिन वाझेला महापालिकेच्या कंत्राटदारांकडून वसुली करण्यास सांगण्यात आले होते. तशी माहिती न्यायालयाच्या रेकॉर्डवर आलेली आहे. त्यामुळे नालेसफाईच्या कामाची आणि वाझेची चौकशी करण्यात यावी, असं शेलार यांनी म्हटलं आहे. "मुंबई महापालिकेची मान्सूनपूर्व तयारी पूर्णपणे झालेली नाही. नालेसफाईचे काम १०० टक्के पूर्ण झाल्याचा महापालिकेचा दावा खोटा आहे. नालेसफाई करून दाखवण्याचा दावा करणाऱ्या शिवसेनेला या जबाबदारीतून हात झटकता येणार ...पान २ वर...

## तरुणीचा विनयभंग करीत जिवे मारण्याची धमकी, शहर पोलिसात तक्रार दाखल



यवतमाळ : शहरातील चांदोरे नगर परिसरात राहणाऱ्या एका ३४ वर्षीय तरूणीला अश्लील शिविगाळ करीत जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना शनिवारी ५ जून रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी शहर पोलिसांनी आशीष उर्फ बगीरा दांडेकर (३५) रा. मेंडकीपुरा यवतमाळ, शुभम बगेल (२६) राधाकृष्ण नगरी, लोहारा, गौरव आणि एका अनोळखी तरूणांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शहरातील एक तरूणी कुटूंबीयातील सदस्यासह जेवन करण्यासाठी शनिवारी बाहेर गेली होती. त्यांच्यासोबत अनिकेत गावंडे नामक तरूण देखील होता. दरम्यान जेवन करून घरी आल्यावर घराजवळ आशिष उर्फ बगीरा दांडेकर, शुभम बगेल, गौरव आणि एक अनोळखी तरूण उभे होते.

यावेळी शुभम बघेल याने सदर तरूणीला अनिकेत गावंडे तुझ्यासोबत कसा, माझे त्याच्यासोबत पटत नाही, असे म्हणाला. यावेळी ...पान २ वर...

## अनैतिक संबंधाला अडसर ठरलेल्या पतीचा, पत्नी व तिचे प्रियकराने खून करुन केलेल्या गुन्हयाची दहिसर पोलीस ठाणे कडून उकल



गुन्हयातील महिला आरोपीताने समक्ष पोलीस ठाण्यात येवून तक्रार दिली की, त्यांचे पती नामे रहीस करामत अली शेख, वय २८ वर्षे हे राहत्या घरातून दि. २९/०५/२०२१ रोजी पासून बेपत्ता आहेत त्यानुसार हरविळलेले मोठी माणसे नोंद वही क्रमांक ७७/ २०२१ अन्वये नोंद घेण्यात आली. हरविलेल्या इसमाचा शोध घेत असताना तक्रारदार पत्नी आणि आजुबाजूऱ्या लोकांकडे केलेल्या चौकशीमध्ये तफावत आढळून आल्याने तिचेकडे सखोल चौकशी केली असता तिने चौकशीमध्ये उडवा उडवीची उत्तरे देवून पोलीस पथकाची दिशाभुल केली. गुन्हे प्रकटीकरण पथकास सदर हरविलेल्या इसमाचे जिविताबाबत संशय निर्माण झाल्याने त्या अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास चालू करुन त्फ्मरदाराऱ्या घराची बारकाईने पाहणी केली असता पाठिमागीलळ किचन रुममधीलळ तीन फरश्यांमध्ये छेडछाड केल्याचा संशय आल्याने पोलीस पथकाने सदरचा दुवा लक्षात घेवून बुध्दी कौशल्याने त्फरदार महिलेकडे पुन्हा कसन चौकशी केली त्यामध्ये ती सहकार्य न करता वारंवार खोटे बोलत असल्याचे निष्पन्न झाले. चौकशी दरम्यान पथकास तक्रार्दार महिलेच्या प्रियकराचीही माहिती मिळुन आली परंतु तो फरार असल्याचे निष्पन्न झाले. अधिक संशय बळावल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार त्फरदार यांचे राहते घरातील किचन रुममधील फरश्या काढुन खोदकाम केळे असता हरविलेल्या इसम नामे रहीस करामत अली शेख, वय २८ वर्षे याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने जमिनीत तीन फुट खोल खडडूयात पुरल्याचे दिसुन आले. सदरवरुन मयत: इसमाची पत्नी व तिचा प्रियकर यांनी संगणमताने त्यांचे अनैतिक संबंधाना अडसर ठरलेला मयत रहीस करामत अली शेख, वय २८ वर्षे याचा दि. २२/०५/२०२१ रोजी मध्यरात्री वायरने गळा आवळून खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह राहत्या घरातील किचनच्या जमिनीमध्ये पुरला तसेच पोलीसांना हरविलेल्या व्यक्तिची खोटी माहिती दिली म्हणुन मयत इसमाचा भक अनिस शेख यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन गु.रक्र ७६०/ २०२१, कलम ३०२,२०१,१७७,३४ भादवि. अन्वये गुन्हा ...पान २ वर...

## सृष्टी सेक्टर ०१ मिरारोड पूर्व येथे खून करुन फरारझालेल्या आरोपीस काशिमीरा पोलीस स्टेशनकडून अटक



फिर्यादी श्री. मान उदय सिंग वय ६१ वर्षे हे कुंभा बिल्डींग, सेक्टर १, सृष्टी, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे येथे रहावयास असून आरोपीत सुभाष बिजली पांडे व अमित रंजितकुमार सौरव ऊर्फ तिवारी हे सदर सोसायटीमध्ये वाचमन म्हणुन कामास होते. फिर्यादी यांचा मुलगा अभिषेक मान सिंग, वय १९ वर्षे याचे आरोपीत वाचमन यांचेबरोबर दोन दिवसांपुर्वी पिण्याचे पाणी मागण्याच्या कारणावरुन वाद झाला होता. सदर गोष्टीचा आरोपीत यांनी मनात राग धरुन दिनांक २९/०५/२०२१ रोजी ००.३० वाजता मयत अभिषेक सिंग हा राहते सोसायटीच्या गेटवर आला असता, आरोपीत यांनी त्यास शिवीगाळ व दमदाटी करुन धारदार हत्याराने छातीवर, पोटावर, डाव्या पायावर वार करुन गंभीर स्वरुपाचे दुखापती करुन जीवे ठार मारले म्हणुन काशिमीरा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्र. । ४१२/२०२१ भादंविसक ३०२, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात यापुर्वी आरोपी सुभाष बिजली पांडे, वय ५६ वर्ष यास अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी अमित रंजितकुमार सौरभ ऊर्फ तिवारी वय ४३ वर्षे हा घटनास्थळावरुन खुन करुन पळुन गेला होता. सदर गुन्हयात तांत्रीक माहीतीचे आधारे मुख्य आरोपी हा जुहु, मुंबई येथे असल्याचे माहिती प्राप्त झाल्याने त्यास लागलीच ताब्यात घेवुन दि ०३/०६/२०२१ रोजी अटक करण्यात आलेली आहे. मुख्य आरोपी अमित रंजितकुमार सौरभ ऊर्फ तिवारी याचेविरुध्द यापुर्वी सन २००५ मध्ये जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर येथे खुनाचा प्रयत्न ...पान २ वर...

## धक्कादायक! नातेवाईकांना मृतदेहाचा चेहरा दाखवण्यासाठी भयंकर प्रकार, माणुसकीला काळीमा



सातारा : करोनाच्या जीवघेण्या संसर्गामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात हाहाकार सुरू आहे. अशात मोठ्या प्रमाणात राज्यात मृतदर वाढत असल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी जागाच उरली नाही आहे. रुग्णालयातही करोना मृतदेहांचा खच पडला आहे. या सगळयात माणुसकीला काळीमा फासणारी घटना ...पान २ वर...

## कर्तव्यावर असलेल्या होमगार्डशी वाद घालणाऱ्या कथीत पत्रकारावर गुन्हा दाखल



कराड शहरातील कोरोना विषाणू संसर्ग रोखण्याकरीता मा.जिल्हाधिकारीसो सातारा यांचेकडील आदेशाचे तंतोतंत पालन करण्याकरीता कराड शहर पो.ठाणे हद्दीत सैदापूर कॅनोल, विजयदिवस 'चौक, भेदा चौक, कोल्हापूर नाका, कार्वे नाका, व ढेबेखाडी फाटा याठिकाणी नाकाबंदी बंदोबस्त लावण्यात आलेले आहेत. तसेच शहरामध्ये विनाकारण फिरू नये म्हणून बीट मार्शल पेट्रोल्तिग नेमण्यात आलेले आहे. गल्ली बोळातील च मुख्य रस्त्यावरील काही दुकानदार व विक्रेते नियमाचे उल्लंघण करून विक्री करत असल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता खाजगी वेशातील अधिकारी व अंमलदार यांची दोन गोपनीय पथके तयार करणेत आलेली आहेत, कराड शहर पो.ठाणे कोराणा संसर्ग रोखण्याकरीता चोख बंदोबस्त असून नियमाचे उल्लंघण करणाऱ्या दुकानदारांचेवर दंडात्मक कारथाई करून व दंड न भरल्यास गुन्हे दाखल करून दुकाने सील करण्यात आलेल्या आहेत. तेसेच शहरात विनामास्क फिरणाऱ्या लोकांचेयर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. पोलीसांचे सोबत होमगाई सुद्धा खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. दि.०३/०६/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा सुमारास कर्मवीर पुतळ्या जवळ होमगाई शुभम महापुरे यास कर्तव्य नेमण्यात आलेले होते सदर ठिकाणी कर्तव्य बजावत असताना वत्त चौक येथुन एस.टी.स्टॅण्ड जाणारे रोडचे बाजूने मोटार सायकलबरुन दोन इसम आले मोटार सायकल चालविण्याऱ्या इसमाने मास्क लावला नव्हता व सदर मोटार सायकलवर $ ९ क्राईम न्युज असे लिहलेले होते. होमगार्ड महापुरे यांनी मोटर सायकल चालकास मास्क का लावला नाही, असे विचारले असता मी पत्रकार आहे. असे म्हणून हुज्जत घातली. सदर ब्याबत होमगार्ड महापुरे याने आपल्या मोबाईलमध्ये व्हीडीओ केला असता. $ ९ क्राईम न्युज संतोष कदम याने त्यांचे हातातील मोबाईल हिसकावून त्यांचे अंगावर थावून गेला सदर बाबतची माहिती कराड शहर पो.ठाण्याचे

वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.आर.पाटील साहेब यांना मिळाली त्यांनी तात्काळ घटनेच्या ठिकाणी जायून कर्तव्यावर असलेले होमगार्ड शुभम महापुरे यांचेकडून माहिती घेततली. होमगार्ड शुभम महापुरे याने दिलेल्या तक्रारीनुसार तथाकथित पत्रकार संतोष कवम उर्फ एस के मामा याच्या विरुद्ध गुन्हा नोंद केलेला आहे. सदर बाबत कराड शहर पोलीस ठाणे मुरनं ३३५ २०२९ भा दं.विस कलम.३५३,१८८,२६९ सरह महाराष्ट्र कोविड ...पान २ वर...

# चोरट्यांच्या दहशतीचे ठाणे




ठाणेः ठाण्यात सोसायटीमध्ये घुसून एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी लांबवल्याच्या घटनेनंतर चोरट्यांना पोलिसांचा कोणताही धाक राहिलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. भरदिवसा चोरटे लुटालुटीचे प्रकार करू लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून चोरट्यांची दहशत इतकी वाढली आहे की रस्त्यावरून चालत जाणे किंवा दुचाकीवरून प्रवास करणेही आता धोक्याचे झाले आहे. पत्नीसह दुचाकीवरून निघालेल्या उमेश गद्रे यांच्या खिशातील मोबाइल अन्य दुचाकीवरील चोरट्यांनी खेचल्यानंतर त्यांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु, चोरट्यांनी गद्रे यांच्या दुचाकीला लाथ मारल्याने गद्रे दाम्पत्य खाली पडल्याचा खळबळजनक प्रकार नुकताच माजिवडा पुलावर घडला. यामध्ये दोघांनाही दुखापत झाली असून या प्रकरणी राबोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ढोकाळी येथील हायलँड गार्डन्स मध्ये उमेश गद्रे (५६) राहतात. त्यांचे नौपाडा परिसरातही घर असून डागगुजीच्या कामानिमित्त ३१ मे रोजी या घरी आले होते. सायंकाळी ते पत्नीसह मुंबई-नाशिक महामार्गावरून ढोकाळीच्या घरी जाण्यासाठी निघाले. माजिवडा पुलावरून जात असताना सायंकाळी ५.५५ वाजता वाय जंक्शनच्या अगोदर डावीकडून दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांपैकी मागे बसलेल्या चोरट्याने उमेश यांच्या वरच्या खिशात असलेला मोबाइल खेचला. उमेश यांनी मोठ्या धैर्याने डाव्या हाताने चोरट्याला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु चोरट्याने उमेश यांच्या दुचाकीला लाथ मारल्याने ते आणि त्यांच्या पत्नी दुचाकीवरून खाली पडले. चोरटे सात हजारांचा मोबाइल चोरून दुचाकीवरून पळून गेले. उमेश यांनी दिलेल्या तक्रारीनंतर शुक्रवारी रात्री १० वाजता दोन चोरट्यांविरुद्ध राबोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोरट्यांना पकडण्यासाठी राबोडी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत.

# रायगडावरुन संभाजीराजेंची आंदोलनाची हाक; 16 जूनला पहिला मोर्चा काढणार






रायगडः मराठा आरक्षणाप्रश्नी राज्य सरकारला ६ जूनपर्यंत अल्टिमेटम देणाऱ्या खासदार संभाजीराजे यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास १६ जूनपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा संभाजीराजे यांनी किल्ले रायगडावरुन केली आहे. मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टात रद्द झाल्यानंतर भाजपचे खासदार संभाजीराजे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ६ जूनपर्यंत आरक्षणाच्या मुद्द्यावर तोडगा निघाला नाही तर थेट रायगडावरुन घोषणा करु असा इशारा संभाजीराजेंनी दिला होता. त्यावरुन आज शिवराज्यभिषेक दिनी संभाजीराजेंनी आंदोलनाची हाक दिली आहे. आत्तापर्यंत तुम्ही माझा संयम पाहिला. हो आहे मी संयमी. पण इथून पुढे तुम्ही माझा संयम पाहणार नाहीत. मी मराठा समाजाला न्याय दिल्याशिवाय गप्प बसणार नाही. काय होईल ते होईल. म्हणून आम्ही ठरवलंय की आंदोलन हे निश्चित आहे. असं घणाघात संभाजीराजे यांनी केला आहे. तसंच, छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळापासून येत्या १६ जूनला पहिला मराठा मोर्चा निघेल, असा इशारा संभाजीराजेंनी दिला आहे.

मराठा समाजाचा मागण्या मान्य न झाल्यास मुंबई ते पुणे लाँग मार्च काढणार, असा इशाराही संभाजीराजे यांनी दिला आहे. तिथे तुम्हाला लाठी मारायची असेल, तर पहिली लाठी संभाजी राजेला मारावी लागेल. छत्रपतींच्या वंशजावर पहिली लाठी मारावी लागेल. आम्हाला गृहीत धरू नका, असंही त्यांनी म्हटलं आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. या समितीने अहवालात काही शिफारसी केल्या होत्या, मी पत्रकार परिषद घेऊन ज्या गोष्टी नमूद केल्या होत्या त्याच समितीने सांगितल्या. मी सांगितलेल्या पाच मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करावी, समाजाला वेठीस धरु नये, असं आवाहन संभाजीराजेंनी केलं आहे. 'माझा लढा ७० टक्के गरीब मराठ्यांसाठी आहे. आपलेच पुढारी कोण चुकलं-कोण बरोबर या स्पर्धेत लागले. मागच्या सरकारचे लोकं म्हणाले आत्ताच्या सरकारने मांडणी बरोबर केली नाही.

# शिराळा एमआयडीसीला वादळाचा तडाखा; ६ जण जखमी



सांगली:शिराळा येथील एमआयडीसी परिसरात आज सायंकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे अनेक कंपन्यांच्या इमारतींसह घरांचे पत्रे उडाले. भिंती पडल्याने काही इमारती जमीनदोस्त झाल्याने प्रचंड नुकसान झाले. (

गेल्या तीन दिवसांपासून सांगली जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाऊस धडक देत आहे. आज शिराळा तालुक्यात झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने तारांबळ उडवली. आज दुपारी २ वाजल्यापासून काळे ढग दाटून आले होते. ४ वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. वादळी वारा व पावसाची तीव्रता इतकी जास्त होती की शिराळा एमआयडीसी परिसरातील कंपन्यांच्या छतावरील पत्रे उडून जायला सुरुवात झाली. पत्रे उडाल्याने आणि झाडांची पडझड झाल्याने इमारतींसह वाहनांचे मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे. काही ठिकाणी विजेचे खांब उन्मळून पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे.

काही कंपन्या लॉकडाऊन मुळे बंद आहेत तर काही कंपन्या शासकीय नियमानुसार ठरवून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार सुरू असल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. उडून गेलेले पत्रे व पडलेले इमारतीचे काही भाग पाहिले असता या ढगफुटीची आणि वादळाची तीव्रता लक्षात येते. शिराळा एमआयडीसी मध्ये काम करणाऱ्या दोन महिला व चार पुरुष असे सहा जण जखमी झाले आहेत. वादळी पावसानंतर शहरातील सामाजिक कार्यकर्ते त्याचबरोबर कंपन्यांचे मालक, व्यवस्थापकांनी एमआयडीसीमध्ये धाव घेत किती नुकसान झाले आहे याचा अंदाज घेण्याचे काम सुरू केले आहे.

# ठाण्यातील सोसायटीत थरार; वृद्धेच्या डोळ्यात मिरची पूड टाकली आणि...



ठाणे: वृद्धेच्या डोळ्यात मिरची पूड टाकून चोरट्याने वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी सकाळी ठाणे शहरातील कोलबाड परिसरात घडला असून नागरिकांनीच चोरट्याला पकडून बेदम चोप दिला. पोलिसांनी या चोरट्याला अटक करत त्याच्याकडून सोन्याचा ऐवज हस्तगत केला आहे. या प्रकरणी राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोलबाड रस्त्यावर असलेल्या एका सोसायटीमध्ये ही ७५ वर्षीय वृद्ध महिला राहत असून शुक्रवारी सकाळी त्या भाजी घेऊन घरी निघाल्या होत्या. सकाळी ९.५० वाजता राहत्या इमारतीच्या लिफ्टजवळ आल्यानंतर त्यांच्या मागोमाग आलेल्या अमित कदम (३०) याने मदत करण्याच्या बहाण्याने वृद्धेच्या हातातील भाजीच्या दोन्ही पिशव्या लिफ्टमध्ये ठेवल्या. त्यानंतर अमितने खिशातून मिरची पूड काढत ती वृद्धेच्या डोळ्यात टाकली व तिच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची सोनसाखळी खेचली. परंतु, नागरिकांनीच अमितला पकडून बेदम चोप दिला. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ धाव घेत अमित कदम याला ताब्यात घेतले आहे. अमितला अटक करण्यात आल्याचे राबोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरतोडे यांनी सांगितले. त्याच्याकडून चोरलेली सोनसाखळी हस्तगत करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

# रिक्षावाले मेटाकुटीस; दीड हजारांचे अनुदास मिळवण्यास तांत्रिक अडचणी



करोनाच्या निर्बंधामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या रिक्षाचालकांना राज्य सरकारने दीड हजाराची आर्थिक मदत जाहीर केली असली तरी त्यासाठी रिक्षाचालकांना ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. मात्र हा अर्ज करताना रिक्षाचालकांना अडचणी येत असून या अडचणींबाबत नुकतीच रिक्षा संघटनांचे पदाधिकारी आणि आरटीओ अधिकाऱ्यांची ठाणे आरटीओ कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीमध्ये अडचणींबाबत चर्चाही झाली. करोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने लॉकडाउनचा निर्णय घेतला. परंतु हा लॉकडाउन हातावर पोट असणाऱ्यांसाठी मोठा अडचणीचा ठरला. त्यामुळे गरिबांना गहू, तांदूळ अशा अन्नधान्यासह आर्थिक मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला. यापैकी काही घटकांच्या बँक खात्यात दीड हजार रुपये देण्याचे ठरवले आहे. यामुळे ठाणे आरटीओतील परवानाधारक सुमारे ८५ हजार रिक्षाचालकांना फायदा होणार आहे. मात्र बहुतांशी रिक्षाचालक हा फायदा घेण्यासाठी फारसे उत्सुक नाहीत. आर्थिक मदत जाहीर झाल्यापासून अवघ्या नऊ हजार रिक्षाचालकांनी अनुदानाची प्रक्रिया पूर्ण केल्याची माहिती आरटीओ सूत्रांनी दिली. अनुदान मिळविण्यासाठी रिक्षाचालकांना ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

ऑनलाइन अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र अर्ज करताना रिक्षाचालकांना काही अडचणी येऊ लागल्या आहेत. याबाबत नुकतीच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनामध्ये आरटीओ अधिकारी आणि रिक्षा संघटनांचे पदाधिकारी यांची एक बैठक पार पडली. या बैठकीमध्ये उप प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंतकुमार पाटील यांच्यासह इतर अधिकारी तसेच ठाण्यातील विविध रिक्षा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.प्रामुख्याने रिक्षाचालकांना आधारकार्डवर लिंक असलेला मोबाइल क्रमांक आणि बँक खात्याचा मोबाइल क्रमांक यात तफावत असणे, काही महिला रिक्षाचालकांचे बँक खाते नसणे, काही महिला रिक्षाचालकांचे लग्नाआधीचे नाव आणि लग्नानंतरचे नाव भिन्न असणे यामुळे अर्ज सादर करता येत नाही. ज्या रिक्षा परवानाधारकांना जुन्या अभिलेखानुसार मॅन्युअल रिक्षा परवाने जारी करण्यात आले आहेत, त्यांच्या परवान्यांचा अभिलेख संगणकीय अभिलेखावर अद्ययावत करण्यात आलेला नाही. परिणामी ऑनलाइन अर्ज भरताना अडचणी येत असल्याचे रिक्षाचालकांचे म्हणणे आहे.

# 'खासदार इम्तियाज जलील यांना औरंगाबाद जिल्ह्यातून तडीपार करा'



औरंगाबाद : जिल्ह्यातील सामाजिक वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न खासदार इम्तियाज जलील करीत आहेत. जिल्हा प्रशासनाच्या विरोधात जाणीवपूर्वक भूमिका घेणे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे वागणे, दंगलसदृश परिस्थिती निर्माण करणे, वारंवार प्रक्षोभक विधाने करण्याचे प्रकार करीत आहेत. त्यामुळे जलील यांना औरंगाबाद जिल्ह्यातून तडीपार करावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष नागराज गायकवाड यांनी केली आहे. याबाबत गायकवाड यांनी पोलिस अधीक्षक डॉ. निखिल गुप्ता यांना गुरुवारी निवेदन दिले. खासदार जलील शासकीय कार्यालयात जाऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकावत आहेत. महिला पोलिस कर्मचाऱ्यांचा अपमान करीत आहेत. जलील यांच्या जातीय ध्रुवीकरणाला बळी पडून जिल्ह्यात दंगल होण्याची शक्यता आहे. दलित चळवळीतील सामान्य कार्यकर्त्याला वेगळा न्याय आणि खासदाराला वेगळा न्याय का, असा प्रश्न गायकवाड यांनी उपस्थित करीत जलील यांच्यावर विविध कलमांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांचा संदर्भ दिला आहे.

# सावधान! पुण्यात तीन महिन्यांत 60 हजार मुलांना संसर्ग



पुणे, करोनाच्या दुसऱ्या लाटेत मार्च ते मे या अवघ्या तीन महिन्यांत शून्य ते १८ वर्षातील ६१ हजारांहून अधिक मुलांना करोनाचा संसर्ग झाल्याचे निदान झाले असून, पुणे जिल्ह्यात एकूण बाधितांच्या तुलनेत त्याचे १०.३ टक्के एवढे प्रमाण आहे. त्यापैकी आतापर्यंत जिल्ह्यातील ५९ हजार ५५९ मुले उपचारानंतर घरी परतली असून, आजमितीला पुणे, पिंपरी-चिंचवड; तसेच जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १७४१ मुलांवर उपचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

मार्च ते मे या तीन महिन्यांत पुणे शहरासह जिल्ह्यात सर्व वयातील एकूण पाच लाख ९५ हजार ७४८ जणांना संसर्ग झाला होता. त्यापैकी शून्य ते १८ वयातील ६१ हजार ३०९ जणांना करोनाची लागण झाली. पुणे शहरात दोन लाख ६६ हजार १३१ जणांपैकी २६ हजार २५७ म्हणजेच ९.९ टक्के मुलांना संसर्ग झाला आहे.

## पृष्ठ १ वरुन

### मुंबईसह कोकणात चार दिवस

करण्याचे आणि समन्वय राखण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत. या काळात कोविडसह इतर कोणत्याही स्वरूपाच्या रुग्णसेवेत अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेतांना धोकादायक इमारती, दरडग्रस्त भाग आणि लोलाईन एरियातील नागरिकांना गरजेनुसार सुरक्षितस्थळी हलवावे अशा सूचनाही त्यांनी दिल्या. हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने मुंबई महानगर क्षेत्र, कोकणातील सर्व जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. पालकमंत्र्यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घ्यावी, या अतिवृष्टी काळात गरज पडल्यास मदतीसाठी तटरक्षकदल, नौदलाला तयार राहण्याची सूचना कळवण्यात यावी असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, किनारपट्टी भागात होणाऱ्या या अतिवृष्टीची माहिती स्थानिक प्रशासनाने नागरिकांनाही द्यावी, या काळात नद्यांचा प्रवाह बदलतो आणि त्यामुळे अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरते हे लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांची काळजी घ्यावी. जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका घेऊन जिल्ह्यातीलआपत्ती व्यवस्थापनाच्या कामांचा तातडीने आढावा घ्यावा अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या. दोन दिवसांपूर्वीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. राज्यातील काही भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली होती. त्या अंदाजानुसार येत्या दोन दिवसात महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होईल अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली होती. ते भाकीत खरं ठरताना दिसत आहे. मान्सून सक्रिय झाल्याने राज्यात शेतीच्या कामांना वेग आला आहे. हवामान तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनी ट्वीट करत महाराष्ट्रात मानसून दाखल झाल्याची माहिती दिली होती.

### फुड स्टॉलच्या कर्मचाऱ्याला मारहाण

केला. त्याआधी नगरसेविकेने विनयभंगाचा आरोप केल्यानंतर त्या व्यक्तीला अटक करण्यात आली होती. अटकेनंतर त्या व्यक्तीला न्यायालयीन कोठडीत पाच दिवस घालवावे लागले होते. पोलिसांनी मारहाणीची तक्रार मिळाल्यानंतर नगरसेविकेविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

२० मे रोजी भांडण झाल्यानंतर तेथील एका कर्मचाऱ्यावर प्लास्टिक पाईपने हल्ला केल्याची तक्रार दिल्यानंतर बांगूर नगर पोलिसांनी शनिवारी पालिकेच्या नगरसेवकाविरोधात मारहाण, धमकी आणि चोरीबद्दल गुन्हा नोंदविला आहे. त्याआधी नगरसेविकेने आरोपीविरूद्ध विनयभंगाची तक्रार दाखल केली होती, त्यानंतर त्याला अटक करण्यात आली आणि पाच दिवस कोठडीत घालवावे लागले. नगरसेविकेनीही केली होती तक्रार नगसेविकेनेदेखील त्यांच्या विरोधात बांगूरनगर पोलिसांत तक्रार केली आहे होती. निर्बंध असतानाही दुकान सुरू असल्याचे दिसल्याने हटकले असताना दुकानदाराने विनयभंग केल्याचा आरोप नगरसेविकेने केला आहे होता. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता. या घटनेनंतर पोलीस ठाण्यात नेल्यानंतर त्या व्यक्तीविरुद्ध विनयभंगाच्या गुन्हा दाखल करण्यात आला. २० मे रोजी अटक करण्यात आल्यानंतर बोरिवली येथील कारागृहात ठेवण्यात आलं. कोर्टाने त्याला ठाणे कारागृहात न्यायालयीन कोठडी सुनावली त्यानंतर कारागृहाशेजारील केंद्रामध्ये काही दिवस ठेवण्यात आलं. कोर्टाकडून जामीन मिळाल्यानंतर ती व्यक्ती २५ मे रोजी बाहेर पडली.

### "सचिन वाझे आणि

नाही. ७० कोटी रुपये नालेसफाईसाठी खर्च केलेल्या महापालिकेला त्याचा हिशोब द्यावा लागेल. शिवसेनेनं नाल्यावर शेती करण्याची नवीन योजना सुरू केला आहे," असा आरोप शेलार यांनी केला. "गाळ कुठे टाकला? फोटो दाखवा" काही दिवसांपूर्वी आशिष शेलार यांनी पत्रकार परिषद घेत मुंबईतील ३० वॉर्ड असे आहेत, जे शिवसेना आणि काँग्रेसला कधीही जिंकता येणार नाहीत. त्यामुळे या वॉर्डांमध्ये फोडाफोडीचं राजकारण सुरू आहे," असा आरोप करत शेलार यांनी नालेसफाईच्या गाळाबद्दल सवाल केला होता. "७० कोटी खर्च करुन केलेली नालेसफाई संपूर्ण आभासी आहे. विषय दाव्याचा नाही वाद्याचा आहे. मुंबईकरांना शब्द दिला होता, मुंबई तुंबू देणार नाही. आता बचाव करू नका, पळून जाऊ नका. ५ लाख मॅट्रिक टन गाळ काढला म्हणता, मिठी नदीचा जरी गाळ पकडला तरी तो टाकला कुठे? ते सरकारी डम्पिंग ग्राऊंड असेल, तर गाळ टाकल्याचा फोटो दाखवा, खासगी असेल तर सीसीटीव्ही दाखवा, गाळ कुठे मोजला त्या वजन काट्याच्या पावत्या दाखवा," असं आव्हान शेलार यांनी दिलं होतं.

### अनैतिक संबंधाला अडसर ठरलेल्या

दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गंभीर असल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली दोन पथके तयार करुन पाहिजे आरोपीताचा शोध सुरु केला. पोलीसांनी गुन्हयाची माहिती मिळाल्यापासून अवघ्या पाच तासात फरार आरोपीबाबत तांत्रिक तपास आणि बुध्दीकौशल्य वापरुन अतिशय मेहनतीने गौतम नगर, आरे कालनी येथील जंगलात लपून बसलेल्या आरोपीस अटक करुन खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे. नमुद कारवाई श्री. दिलीप सावंत, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. विशाल ठाकुर, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-११, मुंबई, श्री. सुहास पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, श्री. प्रविण पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विकास लोकरे पो.नि. (का. व सु), श्री. संजय मराठे, पो.नि. शासन) यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. डा. चंद्रकांत घार्गे, स.पो.नि. ओम तोटावार, मपोउपनि. वरलक्ष्मी सकिनाल, पो.ह.संदेश तटकरे, पो.ह. देवेंद्र पांगे, पो.ना. शरीफ शेख, पो.ना. भरत मोहिते, पो.शि. चंद्रकांत शिरसाट, पो.शि. राजेंद्र सांगळे, पो.ह. संदिप देशमाने, पो.ह. भिंगारे, पोना. सिध्दार्थ किणी, पोशि. सागर पवार यांनी करुन अथक परिश्रम घेवुन कौशल्यपणे सदरचा गुन्हा उघडकीस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

### तरुणीचा विनयभंग करीत

तरूणीने तू मला विचारणारा कोण? म्हटले असता, शुभम याने अश्लील शिविगाळ केली. मात्र, त्या तरूणीने याकडे लक्ष न देता घरात निघून गेली. दरम्यान, आशिष दांडेकर आणि शुभम बघेल यांनी देखील घरात प्रवेश करून आमचे घर आहे, तू येथून निघून जा, नाही तर मारून टाकेल, अशी धमकी दिली. याप्रकरणी संबंधित तरूणीने दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी आशिष उर्फ बगीरा दांडेकर, शुभम बगेल, गौरव आणि एका अनोळखी तरूणांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### धक्कादायक! नातेवाईकांना

साताऱ्यामध्ये समोर आली आहे. इथे चक्क करोनाच्या मृतदेहांचा नातेवाईकांना चेहरा दाखवण्यासाठी लाच घेत असल्याचं सुरू झालं आहे. कोविड केंद्रामध्ये असे प्रकार सुरू आहे.

### सृष्टी सेक्टर 01 मिरारोड

केलाबाबत गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात त्यास ७ वर्षाची शिक्षा लागली होती व तो सदरची शिक्षा भोगून बाहेर आलेला असल्याची माहीती प्राप्त झालेली आहे. सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०१, श्री. विलास सानप, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संजय हजारे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन, सपोनी. गणेश भामरे, महेंद्र भामरे, प्रशांत गागुर्डे, पोलीस उपनिरीक्षक जावेद मुल्ला व काशिमीरा पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

### कर्तव्यावर असलेल्या होमगार्डशी वाद

१९ अधिनियम २०२० चे कलम ११ सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ए प्रमाणे दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक मारुती सराटे हे करत आहेत. > पोलीसांकडून आवाहन : सध्या महाराष्ट्रात कोगोणा विषाणू संसर्गाने शैरमाण घातलेले आहे. सदरचे संक्रमण तोडण्यासाठी शासनाने दिलेल्या नियमांचे पालण करा. प्रशासन/ पोलीस/होमगार्ड यांचेशी सौजन्याने वागावे, प्रशासनास सहक्तार्य करावे सोशल डिस्टन्सचे पालण करावे. संचारबंदी आदेश लागू असल्याने घरा बाहेर पडू नये दुकानदार व व्यायारी यांनी मा जिल्हाधिकारी सो, सातारा यांनी घालून दिलेल्या नियमांचे व अटीचे पालन करावे घरात रहावे सुरक्षित रहावे कराड शहर अगर परिसरात असे नियम भंग करतांना मिळून आल्यासे त्यांचेषर कारवाई करणेत येईल याची दक्षता घ्याची,

### खबरदारी घेऊन अर्थचक्र

निर्मात्यांनी दिले. के. माधवन, मेघराज राजेभोसले, आदेश बांदेकर, प्रशांत दामले, डॉ. अमोल कोल्हे, सतीश राजवाडे, विजय केंकरे त्याचप्रमाणे मुख्य सचिव सीताराम कुंटे, सांस्कृतिक कार्य सचिव सौरभ विजय आदी या बैठकीत सहभागी झाले होते.


बांधकाम कामगार तसेच राज्यातील इतर उद्योगांमध्ये बाहेरील राज्यांतील कामगार काम करीत असतील तर त्यांची आरोग्यविषयक नोंद व्यवस्थित ठेवा. त्यांनी त्यांच्या राज्यात जाताना आणि तिकडून येताना करोनाचा विषाणू पसरवू नये याची काळजी घ्या. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचीही माहिती ठेवा.

## संपादकीय...



# ...म्हणूनच इथेनॉल ही एक नवी इंधन संजीवनी

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्यासाठी सरकारने १ एप्रिल २०२३ हा दिवस मुक्रर केला आहे. त्या दिवसापासून देशभरातील पेट्रोलपंपांवरील पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळले जाईल. यामुळे भारताचा तेल आयातीवरील खर्च ३० हजार कोटी रुपयांनी कमी होईल, असा अंदाज आहे. तेलाच्या वाढत्या किमती पाहता हा आकडा यापेक्षाही अधिक असू शकतो. यातून सरकारचे बहुमूल्य परकीय चलन वाचणार आहे. हाच पैसा अन्य विकासकामांवर खर्च करता येईल, यापेक्षा सतत अस्थिरतेच्या सावटाखाली असलेल्या देशातील साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्यही मिळून जाईल.ऊठसूट सरकारकडे मदतीसाठी हात पसरावे लागणार नाहीत. इथेनॉलच्या रूपाने परकीय चलन वाचविण्याची आणि साखर उद्योगाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची संजीवनी बुटीच सरकारला मिळाली आहे. एका




अर्थाने याला इंधन संजीवनीही म्हणू शकतो. इंधन तेलाच्या बाबतीत आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले हे मोठे पाऊल असेल. मात्र हे लक्ष्य गाठणे एवढे सोपे नाही. कारण सध्या देशातील इथेनॉलची उत्पादनक्षमता ४२५ कोटी लिटर इतकी आहे. आतापर्यंत ३२० कोटी लिटर इथेनॉल पुरविण्याचे करार तेल कंपन्यांनी इथेनॉल कंपन्यांशी केलेले आहेत. २०२२मध्ये १० टक्के इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळण्याचे लक्ष्य आहे.ते पूर्ण करण्यासाठी आणखी ५० कोटी लिटर पेट्रोलची गरज आहे. ती या वर्षात पूर्ण होणार आहे. त्यामुळे हे लक्ष्य पूर्ण होईल. मात्र त्यानंतरच्या वर्षभरात आणखी ४२५ कोटी लिटरची उत्पादनक्षमता कशी साध्य करणार हा मोठा प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरणदिनी इ-१०० या इथेनॉलशी संबंधित १०० केंद्रांचे उद्घाटन केले आणि इथेनॉलनिर्मिती साध्य करण्यासाठीचा रोडमॅपही जाहीर केला. खरे तर हे याआधीच करायला हवे होते. कारण २०१४ पर्यंत पेट्रोलमध्ये केवळ एक ते दीड टक्का इथेनॉल मिसळले जात होते. उत्पादनही केवळ ३८ कोटी लिटर इतकेच होत होते. सध्या हे उत्पादन ३२० कोटी लिटरवर गेले आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाणही साडेआठ टक्क्यांवर गेले आहे.म्हणजेच इथेनॉल उत्पादनात जवळजवळ आठपट वाढ झाली आहे. इथेनॉल ही हरित ऊर्जा आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो. हे लक्षात आल्यानंतर २०१८ साली केंद्र सरकारने इथेनॉलविषयी स्वतंत्र धोरण जाहीर केले. त्यानुसार नव्या इथेनॉल प्रकल्पांना विविध सोयी सवलती देऊ केल्या. इथेनॉल खरेदीचे दर निश्चित करून इथेनॉल प्रकल्पांना खरेदीची हमी दिली. तसेच २०२५पर्यंत १० टक्के आणि २०३० पर्यंत २० टक्के इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले, मात्र यात मिळणारे यश पाहता हे उद्दिष्ट दोन वर्षे आधीच गाठण्याचे सुधारित लक्ष्य सरकारने तेल कंपन्या आणि साखर उद्योगाला दिलेले आहे.हे अशक्य वाटते म्हणूनच की काय, पंतप्रधानांनी पर्यावरणदिनी केलेल्या भाषणात २०२५ मध्येच २० टक्के लक्ष्य गाठण्याचा उल्लेख केला असावा. असे असले तरी पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळल्याने त्याचा वाहनांवर काही परिणाम होतो काय, हे पाहणे गरजेचे आहे. सध्याची म्हणजेच बीएस ६ मानांकन असलेल्या वाहनांच्या इंजिन्सची क्षमता पेट्रोलमध्ये केवळ १३ टक्के इथेनॉल सामावून घेण्याची आहे. त्याचे प्रमाण वाढविले तर या इंजिन्समध्येही आवश्यक ते तांत्रिक बदल करावे लागतील. ऑटोमोबाइल कंपन्यांना त्यासाठी किती वेळ लागेल, हा बदल नव्याने तयार होणाऱ्या वाहनांमध्ये केला तरी सध्या विक्रीसाठी तयार असलेल्या वाहनांचे काय? शिवाय सध्या रस्त्यावर धावणाऱ्या कोट्यवधी वाहनांचे काय, हाही प्रश्न आहे.चालू वाहनांसाठी लवकर पर्याय सापडला नाही तर प्रत्येक पेट्रोल पंपावर २० टक्के इथेनॉलमिश्रित आणि जुन्या वाहनांसाठी १० टक्के इथेनॉलमिश्रित अशी व्यवस्था करावी लागेल. सर्वात महत्त्वाचे, या इथेनॉलमुळे साखर उद्योगाला मिळणारी आर्थिक स्थिरता. दरवर्षी सुमारे ५० ते ६० लाख टन साखर अतिरिक्त होत आहे. हेच लक्ष इथेनॉलकडे वळविले तर साखर कारखान्यांनाही हमखास उत्पन्नाचा एक नवा मार्ग मिळेल. यातून सुमारे ७०० कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन होऊ शकेल.

# शाश्वत सहयोग!




एक तपाहून अधिक काळ निरंकुश सत्ता भोगल्यानंतर इस्रायलच्या पंतप्रधानपदावरून बेन्यामिन नेतान्याहू यांना पायउतार व्हावे लागत असेल, तर ती घटना अत्यंत महत्त्वाची आणि त्याहूनही अधिक स्वागतार्ह ठरते. याचा अर्थ, त्यांच्या पायउतार होण्याने त्या देशाचे राजकारण एकदम सहिष्णू आणि सर्वसमावेशक होईल असे अजिबात नाही. पण जगभर राजकारणाचा प्रवास कडवेपणाकडून अतिकडवेपणाकडे सुरू असताना, मध्यममार्गी राजकारण म्हणजे नेभळटपणा असे मानण्याची प्रथा रूढ होत असताना आणि सहिष्णुता, सत्शील निधर्मिता हे दुर्गुण मानले जाऊ लागत असताना अशा नवराजकारणाचे प्रतीक असलेल्या नेतान्याहू यांच्यावर सत्तात्यागाची वेळ येणे हे सुखावणारे आहे. या वर्षाच्या सुरुवातीला अमेरिकेच्या अध्यक्षपदावरून डोनाल्ड ट्रम्प यांना जावे लागले. आता त्यांचे वैचारिक स्नेही आणि गंडाबंध सहकारी नेतान्याहू यांची गच्छंती. करोनाचे काळे ढग साऱ्या जगावर झाकोळलेले असताना त्यात या दोन त्यातल्या त्यात सुखावणाऱ्या घटना. ट्रम्प यांचा कोळसा पुरेसा उगाळला गेला आहे. आता समजून घ्यायचे ते नेतान्याहू यांच्या गच्छंतीचे महत्त्व.

नेतान्याहू हे इस्रायलच्या ‘माझे ते माझे आणि तुझे तेही माझे’ या दांडगेश्वरी राजकारणाचे प्रतीक.

नेतान्याहू हे ज्यांचे प्रतिनिधित्व करतात त्या यहुदींच्याच जोडीला पॅलेस्टिनी हेदेखील स्थानिक भूमिपुत्र. पण त्यांना हुसकावून आणि इतकेच काय, त्यांची भूमी बळकावून आपला कार्यक्रम रेटणाऱ्या जहाल यहुदींना खूश करून राष्ट्रवादाची मशाल तेवती ठेवणे हे नेतान्याहू यांचे राजकारण. इस्रायली राजकारण आणि समाजकारणात अतिकडव्या धर्मवादी यहुदींचे म्हणून एक स्थान आहे. सर्वच इस्रायली तसे आहेत असे अजिबात नाही. पण त्या देशाच्या राजकारणावर कडव्यांची पकड आहे खरी. खरे तर कडव्या धर्मवादी यहुदींना ते धर्मसेवा करतात म्हणून अन्यांसाठी अत्यावश्यक असणाऱ्या लष्करी सेवेतून सूट दिली जाते आणि त्यांच्या जगण्याचा मोठा भार सरकार उचलत असते. यावर खरे तर त्या समाजातील एका समंजस वर्गात नाराजी आहे. पण सध्या अशा कडव्या, असहिष्णू धर्मवाद्यांना डोक्यावर घेऊन नाचायचीच पद्धत असल्याने इस्रायलही त्यास अपवाद नाही. हा वर्ग सतत आपल्या बाजूला राहील यासाठी आवश्यक तो कर्मठपणा दाखवत नेतान्याहू यांनी आपले सत्ताकारण यशस्वी केले. यात त्यांना इतके यश आले की, अमेरिकावासी यहुदी दबावगटांच्या साथीने त्यांनी सर्व समन्वयवाद्यांना निकालात काढले.

अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प आल्यानंतर तर या दोघांनी पश्चिम आशियात पॅलेस्टिनींना जगणे नकोसे केले. वास्तविक खुद्द इस्रायलमध्ये साधारण २० टक्के इतके नागरिक हे पॅलेस्टिनी वा अरब आहेत. नेतान्याहू यांनी आपल्या धोरणांनी त्यांना जणू दुय्यम नागरिक केले आणि ट्रम्प यांनी पॅलेस्टिनी भूमीतच त्यांच्या हक्कांवर गदा आणायला सुरुवात केली.

या पार्श्वभूमीवर, नेतान्याहू यांना पुन्हा पंतप्रधानपद न मिळण्यामागील खरा आनंदाचा भाग असा की, सत्तेवर येऊ पाहणाऱ्या इस्रायली महाआघाडीत प्रथमच इस्रायली अरब यांना स्थान असेल. ही घटना फारच महत्त्वाची. ज्यांच्या हक्कांना पायदळी तुडवत नेतान्याहू धर्मांध राष्ट्रवादाचे राजकारण करत होते, त्या अरबांच्या मदतीनेच नवी आघाडी सरकार बनवेल. यातील आणखी एक धडा शिकवणारी बाब म्हणजे, या आघाडीचे नेतृत्व करणारे, संभाव्य पंतप्रधान नफ्ताली बेनेट हे नेतान्याहू यांच्याहीपेक्षा कडवे उजवे आहेत.

पण त्यांच्यावर सत्तेसाठी आपले कडवे उजवेपण मागे सोडून डावे आणि पॅलेस्टिनी अरब अशा दोन अत्यंत विरोधाभासी राजकारण्यांशी हातमिळवणी करण्याची वेळ आली. अशा आठ पक्षांचा समावेश या आघाडीत आहे. मध्यममार्गी, मध्यबिंदूच्या उजवी-डावीकडचे, उदारमतवादी, मजूरपक्षीय, कडव्या उजव्या यामिना आघाडीचे बेनेट आणि युनायटेड अरब लिस्ट पक्षाचे मन्सूर अब्बास अशी ही खिचडी. नेतान्याहू यांचे विरोधक यअर लपिद यांनी ती बनवण्यासाठी पुढाकार घेतला आणि त्यात नेतान्याहू यांच्याच एके काळच्या सहकाऱ्यांची उत्साही साथ लाभली. यात अगदी समलैंगिकांच्या हक्कांचे रक्षण करायला हवे असे मानणारे पुरोगामीही आहेत. वास्तविक बेनेट हे पॅलेस्टिनी भूमी आणि म्हणून त्यांचे हक्क न मानणाऱ्या मताचे. त्यांना साहजिकच द्विराष्ट्रवादाचे तत्त्व मान्य नाही. पण या आघाडीचे प्रणेते लपिद हे पॅलेस्टिनी प्रश्न सामोपचाराने सोडवावा, द्विराष्ट्रवाद मान्य करावा या मताचे. या अत्यंत दोन टोकाच्या मतधाऱ्यांचा सत्तासेतू मधल्या अन्य विचारी सहा स्तंभांच्या पाठिंब्यावर उभा असेल. तो स्थिर होऊ नये यासाठी नेतान्याहू जंग जंग पछाडत आहेत.

या संघर्षांतील महत्त्वाचा टप्पा या आठवडय़ाच्या सुरुवातीला घडेल. इस्रायली प्रतिनिधिगृहाच्या (क्नेसेट) नेतान्याहूवादी सभापतींस हटवण्याचा प्रस्ताव या आठपक्षीय आघाडीकडून दिला जाईल. त्यात त्यांना यश आल्यास पुढील सात दिवसांत क्नेसेटमध्ये बहुमत सिद्ध करण्यातील एक मोठा अडथळा दूर होईल. या नव्या आघाडीस १४ जूनच्या आत बहुमत सिद्ध करावे लागणार आहे. शक्यता अशी की, क्नेसेटचे सभापती दूर करता आल्यास ही नवी आघाडी त्वरित बहुमत सिद्ध करून दाखवेल. कारण एकदा का क्नेसेटमध्ये बहुमत सिद्ध झाले की नेतान्याहू यांचे प्रयत्न निष्प्रभ ठरतील. म्हणजे सरकारच्या दोन धोक्यांतील एक कमी होईल.

मग राहील इस्रायली धर्मवाद्यांचा धोका. ज्याप्रमाणे पॅलेस्टिनींमध्ये आक्रस्ताळे, धर्मांध आणि इस्रायलचे अस्तित्व नाकारणारे अतिरेकी आहेत, त्याचप्रमाणे आणि तितक्याच, किंबहुना अधिक संख्येने ते इस्रायली समाजात आहेत. या यहुदी धर्मांध अतिरेक्यांना पॅलेस्टिनींशी कोणत्याही प्रकारे समझोता करणे मान्य नाही. असा प्रयत्न करणारे माजी पंतप्रधान यिट्झ्ॉक रबीन यांची १९९५ साली हत्या झाली. त्यांचा मारेकरी हा कडवा यहुदी धर्मवादी होता. म्हणजे ज्या पद्धतीने पॅलेस्टिनी हे माथेफिरू अशा हमास आदी कडव्या धर्मवादी संघटनांच्या कच्छपि लागतात, त्याच प्रकारे यहुदी धर्मांध आपल्याच पंतप्रधानाची हत्या करण्यासही मागेपुढे पाहात नाहीत. हा इतिहास आहे. नेतान्याहूविरोधी आघाडीचे नेतृत्व करू पाहणारे बेनेट यांच्या सुरक्षेत कमालीची वाढ करण्यात आली आहे ती रबीन यांच्या या इतिहासाची पुनरुक्ती होऊ नये म्हणूनच.

तेव्हा इस्रायलकडे जगातील सर्वच शांततावाद्यांचे लक्ष असेल. गेल्या तीन निवडणुकांत त्या देशात स्थिर सरकार देईल असे बहुमत कोणालाही मिळाले नाही. या स्थितीचा रास्त फायदा नेतान्याहू यांनी उचलला आणि गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप असतानाही सत्तेवरील आपली मांड सैल होऊ दिली नाही. आताच्याही निवडणुकीत कोणाही एका पक्षास वा आघाडीस बहुमत नाही. पण निवडणुकोत्तर वातावरणातून आपल्यामागे बहुमत ‘तयार’ व्हावे या विचाराने ताजा पॅलेस्टिनी-इस्रायल संघर्ष यथासांग पार पडला.

निवडणूक बहुमतासाठी आपल्या अशक्त शेजाऱ्यास ठेचणे हे काही नवीन नाही. पण इस्रायलमधील नवीन हे की, या ‘प्रयोगा’नंतरही नेतान्याहू यांच्या या ‘युद्धातील’ यशावर राजकीय पक्ष भाळले नाहीत. नेतान्याहू यांचे सत्तास्थापनेचे प्रयत्न अयशस्वी राहिले.

आता कसोटी आहे ती आपले यश टिकावू आहे हे बेनेट, लपिद आणि कंपनीने सिद्ध करून दाखवण्याची. नेतान्याहू यांच्यासारख्या प्रवृत्तीचा एखादुसरा पराभव हा सहिष्णुतेच्या यशाची हमी देत नाही. त्यासाठी पर्यायी विचारधारांना सहयोगातील शाश्वतता सिद्ध करून दाखवावी लागते. म्हणून इस्रायलमधील या प्रयोगाचे महत्त्व.

# यंदाचा लॉकडाउन ठरला 'भीषण'; अपघातांच्या संख्येत वाढ



नाशिकः ग्रामीण भागात करोनाचा जोर वाढत असताना रस्ते अपघातांची विक्रमी नोंद करण्यात आली. गेल्या वर्षीच्या एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या तुलनेत यंदा ३१ जणांचा अपघातांमध्ये जीव गेल्याचे समोर आले आहे. रस्ते अपघातांच्या संख्येतसुद्धा लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यात सर्वच व्यवहार बंद पडले होते. एवढेच काय, तर परराज्यातील नागरिकांना अगदी पायी प्रवास करून आपले गाव गाठावे लागले होते. अगदीच किरकोळ स्वरूपाची वाहतूक त्या वेळी रस्त्यावर होती. मात्र, असे असले तरी एप्रिल आणि मे २०२० या दोन महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यात ७५ प्राणांतिक अपघातांची नोंद झाली होती. ३३ गंभीर, तर किरकोळ दुखापतीचे पाच असे एकूण ११३ अपघात झाले होते. त्यात ८४ नागरिकांना प्राणास मुकावे लागले. ५३ जणांना गंभीर दुखापतीस सामोरे जावे लागले, तर नऊ जणांना किरकोळ दुखापत झाली. २०२१ मध्ये एप्रिल आणि मे या दोन महिन्यांतसुद्धा अनेक नियम लागू होते. कडक लॉकडाउनला नागरिकांना सामोरे जावे लागले. मात्र, २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये रस्ते अपघातांमध्ये भरीव वाढ झाली. मागील दोन महिन्यांत १०४ प्राणांतिक अपघातांना नागरिकांना सामोरे जावे लागले. ६० गंभीर, आठ किरकोळ, तर सात विनादुखापत अशा १७९ अपघातांची नोंद ग्रामीण पोलिसांकडे झाली. प्राणांतिक अपघातांमध्ये ११५ नागरिक मृत्युमुखी पडले. ८० जणांना गंभीर दुखापतीस सामोरे जावे लागले. नऊ व्यक्तींना किरकोळ दुखापत झाली. ग्रामीण पोलिसांनी सांगितले, की जिल्ह्यातून अनेक महत्त्वाचे महामार्ग, राज्यमार्ग गेले असून, देशांतर्गत वाहतूक सुरू होती. त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा नियमांमध्ये अनेक बदल करण्यात आले. त्यामुळे रस्त्यावर वाहने होती. मात्र, सर्वसामान्य परिस्थितीपेक्षा ही संख्या कमीच होती. त्यामुळे रस्ते मोकळे मिळत असल्याने वाहने भरधाव धावली. बहुतांश अपघातांमध्ये भीषण वेग अपघातांना कारणीभूत ठरला. दोन्ही वर्षांत एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यामध्ये रस्ते अपघात वाढलेले दिसतात. लॉकडाउनमुळे रस्ते अपघाताचे प्रमाण अगदीच कमी होणे अपेक्षित असताना दोन्ही वर्षांत हे इप्सित साध्य झालेले नाही.

# पंढरपूर हादरलं! वडिलांनी दीड वर्ष दोन मुलींना ठेवलं डांबून, धक्कादायक आहे कारण...



पंढरपूर : कितीही जनजागृती केली तरी लिंग भेद आणि महिलांवरील अत्याचार काही कमी होत असल्याचं दिसत नाही.

आताही पंढरपूरमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलाच्या हव्यासापोटी उलट्या काळज्याच्या बापाने थेट दोन चिमुकलींना घरात दीड वर्ष डांबून ठेवलं. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूरमधल्या झेंडे गल्ली इथं हा प्रकार उघडकीस आला आहे. वंशाचा दिवा हवा आहे, या इच्छेसाठी पित्याने दोन मुलींना वर्षभर खोलीमध्ये डांबून ठेवलं. इतकंच नाहीतर पत्नी आणि मुलींचा शारिरिक आणि मानसिक छळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, निर्भया पथकाला याची माहिती मिळताच त्यांनी घटनेस्थळी धाव घेतली आणि मुलींची सुटका केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण आहे.

या घटनेची माहिती पोलिसांनीही देण्यात आली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# महामार्गांसाठी दोन लाख झाडांची कत्तल



औरंगाबाद, मराठवाड्यातील चार महामार्गांसाठी पाच वर्षांत तब्बल दोन ते सव्वादोन लाख झाडांची कत्तल झाली आहे आणि त्या बदल्यात नगण्य वृक्ष लागवड करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरातील बाळासाहेब ठाकरे स्मारकासाठीही तीन हजार झाडांचा बळी देण्यात आल्याचे समोर येत आहे. पुन्हा संपूर्ण मराठवाड्याचे सरासरी ग्रीन कव्हरेज हे पावणेचार टक्क्यांपेक्षा जास्त नाही आणि हे कव्हरेज वाढवण्यासाठी ठोस प्रयत्न होतानाही दिसत नसल्याचे दुर्दैवी चित्र जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अधोरेखित झाले आहे. वृक्ष हा पर्यावरणाचा सर्वांत मोठा व महत्त्वाचा घटक असल्याचे निर्विवाद आहे. मात्र, याच जीवनदायी घटकावर घाव घालण्याचा सपाटा सुरू आहे आणि गेल्या पाच-सात वर्षांत झालेल्या किंवा होत असलेल्या समृद्धी महामार्ग, धुळे-सोलापूर महामार्ग, औरंगाबाद-जळगाव महामार्ग, औरंगाबाद-पैठण महामार्गासाठी आतापर्यंत दोन ते सव्वादोन लाख झाडांची कत्तल झाली आहे. औरंगाबाद-सोलापूर महामार्गावर औरंगाबाद ते थापटी तांडापर्यंत (ता. पैठण) एका रांगेत असलेली १५० ते २०० वर्षे जुनी वडाची झाडे भुईसपाट करण्यात आली आहे. औरंगाबाद ते उस्मानाबादपर्यंत २६ हजार, तर जळगाव रस्त्यावरही २५ ते ३० हजार झाडांची कत्तल झाली आहे. त्याशिवाय याच महामार्गांसाठी ३२ टेकड्या जमिनदोस्त करण्यात आल्या आहेत. तर, त्या बदल्यात नगण्य प्रमाणात वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन झाले आहे. वस्तुतः एका झाडाच्या बदल्यात तीन झाडे लावण्याचा व त्यांचे संवर्धन करण्याचा नियम आहे. तसेच महामार्गाच्या एकूण खर्चाच्या एक टक्के रक्कम ही वृक्षसंवर्धनासाठी खर्च करणे अपेक्षित आहे. त्यानुसार मराठवाड्यातील महामार्गांसाठी काही कोटी रक्कम वृक्षसंवर्धनासाठी खर्च होणे अपेक्षित असताना ती गिळंकृत करण्यात आल्याचा आरोप ट्री कमिटीचे सदस्य व मानद वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाठक यांनी केला आहे. 'एवढेच नव्हे तर औरंगाबाद शहरातील प्रियदर्शनी उद्यानातील नियोजित बाळ ठाकरे स्मारकासाठी झाडांची कत्तल होणार नाही, अशी ग्वाही खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिली असताना, या ठिकाणी तीन हजार झाडांची कत्तल झाली आहे. या उद्यानात पूर्वी नऊ हजार झाडे होती व आज सहा हजार झाडे शिल्लक आहेत,' असेही डॉ. पाठक यांनी बोलताना सांगितले.

# मिरा भाईंदर महानगरपालिका ऑर्चिड हॉस्पिटल, स्वस्तिक आणि अपूर्वा लॅब यांच्यावर कारवाई.

राज्य शासनाने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी 'मिशन ब्रेक द चेन' च्या अंतर्गत त्रिसूत्रीची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यावर भर दिला. कोरोना रुग्णांवर उपचार करताना सर्वतोपरी काळजी घेत रुग्ण बरा होऊन घरी गेलाच पाहिजे, यावर विशेष भर दिला जात आहे. परंतु मिरा भाईंदर शहर 'कोरोनामुक्ती' कडे वाटचाल करत असताना काही धक्कादायक घटना समोर आल्या. ऑर्चिड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, स्वस्तिक हेल्थ एण्ड वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रा. लि. आणि अपूर्वा डायग्नोस्टीक ॲण्ड हेल्थ केअर लॅब यांचे संगणमताने कोरोना उपचारासंदर्भात फसवणूक करत असल्याची माहिती मिळाली.मिरा भाईंदर शहरातील लोकसंख्येच्या दृष्टीने रुग्ण वाढीची संख्या इतर महानगरपालिकेच्या तुलनेने अधिक असल्याने मा. आयुक्त श्री दिलीप ढोले यांनी वैद्यकीय अधिकारी, नोडल अधिकारी आणि वैद्यकीय आरोग्य विभाग यांना चाचण्यांचे प्रमाण वाढविण्याचे आदेश दिले. त्या आदेशानुसार, कोरोना चाचणीचे प्रमाण वाढविल्याने शहरात पॉजिटिव्हीची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आले. खाजगी रुग्णालयेही खाजगी लॅबच्या माध्यमातून कोविड चाचणीचे अहवाल सादर करत होते. त्यानुसार, ऑर्चिड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, मिरारोड नयानगर या खाजगी रुग्णालयांची तपासणी आणि सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असता तपासणीमध्ये असे निर्दशनास आले की रुग्णांची लक्षणे आणि त्यावर प्रत्यक्ष केलेले उपचार यामध्ये तफावत आढळून आली. तसेच रुग्णांना देण्यात आलेले वैद्यकीय उपचार पध्दती महाराष्ट्र शासनाचे कोविड-19 टास्क फोर्सच्या शिफारशीनुसार नाहीत. ऑर्चिड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलशी याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, रुग्णांचे कोविड स्वॅब सॅम्पल स्वस्तिक हेल्थ एण्ड वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रा. लि. (कनाकिया मिरारोड) यांच्यामार्फत तपासणीसाठी अपूर्व लॅब (मिरारोड) येथे पाठविले जातात. महापालिकेने स्वतःच्या लॅब टेक्निशिअन मार्फत 13 रुग्णांचे ॲन्टीजन टेस्ट आणि आरटीपीसीआर चाचणी केली असता 12 रुग्णांचे अहवाल निगेटिव्ह आले. ऑर्चिड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, स्वस्तिक लॅब आणि अपूर्व लॅब यांच्यावर नयानगर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंडसहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 420, 120-B, 337, 338 व 34 तसेच साथीचे रोग अधिनियम 1897 चे कलम 3 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. 1. स्वस्तिक हेल्थ एण्ड वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रा. लि. बेवर्ली पार्क मिरा रोड यांना रूणालयात चालू असलेले विना परवाना पॅथॉलॉजी लॅब बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे.
2. अपूर्वा डायग्नोस्टीक ॲण्ड हेल्थ केअर (यूनिट ऑफ विठ्ठल मेडीकेअर प्रा. लि.) यांना नोटीस बजावण्यात आली असून भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR) मार्फत आपणांस RT-PCR चाचणी करणेस दिलेली नोदंणी रद्द करणेबाबत शिफारस करण्यात येईल याबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे. 3. ऑर्चिड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता देण्यात आलेली परवानगी दि. 02/06/2021 पासून रद्द करण्यात आली आहे व सदर रुग्णालयास कोणताही नवीन कोविड रुग्ण उपचारासाठी भरती करून घेता येणार नाही असे आदेश दिले आहेत.लोकांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या कोणाचीही गय केली जाणार नाही, असे आश्वासन आयुक्तांनी जनतेला दिले आहे. तसेच संबंधित दोषी असलेले रुग्णालय आणि लॅबवर कठोर कारवाई केली जाईल, अशाप्रकारच्या घटना जनतेच्या निदर्शनास आल्यास त्यांनी त्वरित महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. अशावेळी जनतेनेही जागरूक असणे आणि जागरूकता दाखविणे या दोन्ही गोष्टी गरजेच्या आहेत. त्यासाठी पालिका, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

## मीरा भाईंदर, वसई विरार आयुक्तालयातील भाडेकरू इसमांची माहिती देण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (2) अन्वये पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांचे आदेश जारी

मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयामध्ये स्थलांतरित नागरिकांचे वास्तव्याचे प्रमाणात मोठया संख्येने वाढ झालेली आहे. स्थलांतरित इसमांना घर, सदनिका, हाटेल, जागा, इत्यादी भाडे तत्वावर देतांना संबंधित घरमालक हे भाडेकरुंच्या ओळखीबाबत कोणतीही शहानिशा न करता नागरिकांना घरे भाडयाने देतात व त्यांचेकडून ओळखीबाबत कोणतेही कागदपत्रे घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे.

त्यापैकी काही लोक अवैध व्यवसाय, गुन्हे व समाज विरोधी कृत्यांमध्ये सामील असल्याचे दिसुन आले आहे, अशा काही इसमांमुळे निर्माण होऊ शकणा या संकटावर प्रतिबंध करण्यासाठी त्यांची माहिती पोलीस ठाणेस अद्यावत करणे आवश्यक आहे. त्याकरीता मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे हद्दीतील नागरिकांना निवासी क्षेत्रामध्ये सदनिका/फ्लट, घर, दुकाने, हाटेल, जागा इत्यादी भाडेतत्वावर देतांना संबंधित मालकांनी, भाडेकरू इसमांनी, सोसायटीचे चेअरमन व इस्टेट एजंट यांनी संबंधित पोलीस ठाणेस भाडेकरुंबाबतची आवश्यक ती माहिती व कागदपत्रे ०३ दिवसांचे आत ईमेल किंवा टपालाद्वारे देण्याबाबतचे आदेश श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा भाईंदर वसई विरार यांनी जारी केले आहेत. सदरचे आदेश हे दिनांक ०७/०६/२०२१ रोजीचे ००.०१ ते दिनांक ०४/०८/२०२१ रोजीचे २४.०० वा.पर्यंत लागु राहतील. सदरची माहिती पोलीस आयुक्ताल यांचे वेबसाईट www,mbvv,mahapolice.gov.in द्वारे देखील पोलीस ठाण्याला देता येईल.

## शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना दणका; 4 कोटी रुपये किमतीच्या बियाण्यांचा साठा जप्त



यवतमाळ : पेरणीचा हंगामात बोगस बियाणांचा सुळसुळाट काही थांबण्याचं नाव घेत नसल्याचं चित्र आहे. कारण यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यात असाच एक प्रकार समोर आला असून बियाण्यांचा अधिकृत साठा जप्त करत संजय मोहनलाल मालानी (५४) रा. बोरीअरब याच्यावर कारवाई करून गोदाम सील केले आहे. दारव्हा तालुक्यातील बोरी अरब येथील धरतीधन सीड प्रोसेसिंग प्लांटमध्ये शुक्रवारी ४ जून रोजी सांयकाळी ५ वाजताच्या दरम्यान पुणे, यवतमाळ व दारव्हा येथील कृषी विभागाच्या पथकाने धरतीधन सीड प्रोसेसिंग प्लांटमध्ये छापा टाकला. यामध्ये अवैधरित्या बियाणे तयार केले जात असल्याचं उघडकीस आलं आहे. खुल्या बाजारातून सोयाबीन, तूर, चणा आणायचा आणि मशीनमधून छाटणी करून बॅग भरायची आणि तयार झालेली ३० किलोची बॅग शेतकऱ्यांच्या माथी मारायची, असा प्रकार या गुन्हेगारांकडून केला जातो. कमी दरात बियाणे मिळत असल्याच्या आशेपोटी शेतकरी हे बियाणे खरेदी करत होते. मात्र, या बियाण्यांचा भंडाफोड शुक्रवारी झाला.कृषी विभागाच्या पथकाला या संदर्भातील गुप्त माहिती मिळाली होती. कारवाईच्या दृष्टीने तीन पथके तयार करण्यात आली. एकाचवेळी या पथकाने धाड टाकून कारवाई केली.

## अतिप्रसंग करताना ओरडल्यामुळे 12 वर्षांच्या मुलीला धावत्या ट्रेनमधून फेकलं!

सातारा : वास्को निजामुद्दीन एक्सप्रेसमधून १२ वर्षांच्या मुलीला धावत्या ट्रेनमधून बाहेर फेकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अतिप्रसंग करताना आरडाओरडा केला म्हणून एका नराधमाने सदर अल्पवयीन मुलीला रेल्वेतून बाहेर फेकलं. साताऱ्यातील लोणंद ते वाठार स्टेशनच्या दरम्यान रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.



जखमी मुलीला क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या मुलीची प्रकृती स्थिर असून तिच्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. तसंच हाताला दुखापत झाली. सुदैवाने मुलीच्या प्रकृतीला कोणताही धोका नसल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षक सदानंद वायसे पाटील यांनी तातडीने साताऱ्यात येत जिल्हा शासकीय रुग्णालयात जखमीची विचारपूस केली.
रेल्वेमध्ये घडलेल्या या संतापजनक घटनेमुळे लोहमार्ग पोलिसांनी वेगाने तपास करत हे दुष्कृत्य करणाऱ्या आरोपीला भुसावळमध्ये ट्रेन थांबवून अटक करण्यात आली असल्याचे पुणे लोहमार्ग पोलिस अधीक्षकांनी सांगितले. संशयिताने पोलिसांजवळ गुन्ह्याची कबुली दिली आहे. तो मिलिटरीमध्ये नोकरीला आहे. झाशीच्या मिल्ट्री युनिटमध्ये तो काम करतो.

नेमकं काय घडलं?

गोवा-निजामुद्दीन एक्स्प्रेस ही गोव्यावरून सुटल्यानंतर मध्यरात्री दीडच्या सुमाराला साताऱ्याला येते. तिथून पुढे ती लोणंदला जाते. या अर्ध्या तासाच्या प्रवासा दरम्यान हा दुर्दैवी प्रकार घडला. S7 या डब्यात एक कुटुंब प्रवास करत होतो. त्या कुटुंबाचा कर्ता पुरुष हा तीन मुली व पत्नीसह दिल्लीला निघाला होता. रात्री जेवण झाल्यानंतर पीडित मुलगी बर्थवर झोपली होती. यातील आरोपीने झोपेतील मुलीला उचललं आणि बाथरूममध्ये घेऊन गेला. तिथं त्याने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. त्यापूर्वीच जाग आल्याने मुलगी मोठ्याने आरडाओरडा करू लागली.
मुलीने आरोपीला लाथा मारल्या. त्यावेळी आरोपीने 'तू रडू नकोस मी तुला आईवडिलांकडे सोडतो' असं सांगितलं. मुलीला घेऊन तो बाहेर आला आणि अचानक दरवाजा उघडून त्याने मुलीला धावत्या रेल्वेतून बाहेर फेकून दिले.
आदर्की स्टेशन ओलांडल्यानंतर घाट असल्यामुळे रेल्वेचा वेग कमी होता. त्यामुळे मुलगी सुदैवाने बचावली असली तरी ती जखमी झाली. रात्रभर जखमी मुलगी लोहमार्गावरच पडून होती. सकाळी सात -साडेसात वाजण्याच्या सुमारास काही स्थानिक लोकांना जखमी मुलगी लोहमार्गावर जखमी अवस्थेत दिसली. लोणंद येथील ग्रामस्थांनी उपचारासाठी तिला लोणंदच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी मुलीने रात्री घडलेला प्रकार सांगितला.
लोहमार्ग पोलिसांनी या मुलीला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केलं. तिच्या हनुवटीला लागलं आहे. तसंच हातालाही खरचटलं असून पाय फ्रॅक्चर झाला आहे. गरज पडली तर तिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार खासगी रुग्णालयातही हलवण्यात येईल असे सदानंद वायसे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## रुग्णालयातून डिस्चार्जची तयारी सुरू असतानाच रुग्णानं घेतला गळफास



यवतमाळ: जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील करोना सेंटरमध्ये एका रुग्णानं आत्महत्या केली आहे. यामुळं जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. महागाव तालुक्यातील गुंज येथील रहिवासी बळीराम मोतीराम राठोड (वय ५५) असं मृताचं नाव आहे. बळीराम हे करोना पॉझिटिव्ह असल्यानं त्यांना पुसद येथील एका खासगी दवाखान्यांमध्ये २८ मे रोजी भरती करण्यात आलं होतं. मात्र, खासगी दवाखान्यातील खर्च परवडत नसल्यानं त्यांच्या नातेवाईकांनी बळीराम राठोड यांना ३० मे रोजी पुसद येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं होतं. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा सुद्धा झाली होती. त्यामुळं एक दोन दिवसात त्यांना रुग्णालयातून घरी सोडले जाणार होते. त्याबाबतचे सोपस्कार सुरू असतानाच रात्रीच्या वेळी बळीराम राठोड यांनी प्रसाधनगृहातील खिडकीच्या लोखंडी गजाला स्वत:कडील शेला बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली. डॉक्टर नियमित तपासणीसाठी आले असता हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच घटनास्थळी तात्काळ पोलीस हजर झाले. आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. बळीराम मोतीराम राठोड यांच्या पश्चात पत्नी, विवाहित ३ मुले व १ मुलगी असा परिवार आहे. पुसद पोलीस पुढील तपास करीत आहेत.


## करोनाबाधित माओवाद्याचा मृत्यू: उपचारासाठी निघाल्यानंतर पोलिसांनी केली होती अटक



बस्तर : करोना संक्रमित माओवादी नेता, स्पेशल झोन कमिटीचा सदस्य गड्डम मधुकर उर्फ सोबरॉय याचं हैदराबादमध्ये उपचारादरम्यान आज पहाटे निधन झालं आहे. करोनावर उपचार घेण्यासाठी निघालेल्या सोबरॉय याला तेलंगणाच्या वरंगल जिल्ह्यात अटक करण्यात आली होती. बस्तरचे आयजी पी.सुंदरराज यांनी नक्षलवादी सोबरायच्या मृत्यू झाल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे. करोनाबाधित माओवादी सोबरॉय याला उपचारासाठी जात असताना वाहन तपासणी दरम्यान १ जून रोजी तेलंगणाच्या वरंगल पोलिसांनी अटक केली होती. तेलंगणाच्या कोमरमभीम जिल्ह्यातील कोंडापल्ली गावचा रहिवासी असलेला माओवादी गड्डम मधुकर उर्फ सोबरॉय हा २२ वर्षांपासून नक्षलवादी कारवायांशी संबंधित होता.
अटक झाल्यानंतर त्याला कोविडच्या उपचारासाठी हैदराबादच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज पहाटे उपचारादरम्यान हृदयविकाराच्या झटक्यात त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. गड्डम मधुकर उर्फ सोबरॉय हा अवघ्या १८ वर्षाच्या असताना शिक्षण अर्धवट सोडून माओवादी विचारसरणीकडे आकर्षित झाला होता. तो १९९९ मध्ये माओवादी संघटनेत सामील झाला.

## चाईल्ड पोर्नोग्राफीचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर केला शेअर; तरुणाला सायबर सेलकडून अटक

सोलापूर : इन्स्टाग्रामवर चाइल्ड पोर्नोग्राफीचा व्हिडिओ अपलोड करणाऱ्या तरुणास सोलापूर सायबर सेलच्या पथकाने अटक केली आहे. मनीष विजयराज बंकापुरे (वय २३, रा. पूर्व मंगळवार पेठ, कोंतम चौक) असं अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचं नाव असून तो इंजिनिअरिंगचा विद्यार्थी आहे.
सदरच्या व्हिडिओ संदर्भात दिल्लीत आक्षेप घेण्यात आल्याने मुंबईच्या कफ परेड येथील महाराष्ट्र सायबर विभागाच्या पोलिस उपमहानिरीक्षकांकडून विविध सॉफ्टवेअरद्वारे पडताळणी करण्याकरता एक कॉम्पॅक्ट सीडी सोलापूरचे पोलिस आयुक्त अंकुश शिंदे, पोलिस उपायुक्त बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलला देण्यात आली होती.
सायबर पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले तांत्रिक कौशल्य वापरत प्राप्त सीडीमधील अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरिता विविध सॉफ्टवेअरद्वारे माहितीचे विश्लेषण करुन आरोपी बंकापुरे याला अटक केली आहे.
तो इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असताना त्याने हा व्हिडिओ अपलोड केला होता.
त्याने ज्या मोबाईलद्वारे चाइल्ड पोर्नोग्राफीचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर अपलोड केला होता, त्यासह त्याच्याविरुध्द पोलिस नाईक बाबूराव मंगरुळे



यांनी सरकारतर्फे माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६७ (ए) प्रमाणे तक्रार नोंदवली आहे.
जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक बजरंग साळुंखे, फौजदार राणा बायस, नागेश होटकर तसेच पोलिस कर्मचारी संतोष येळे, सचिन गायकवाड, मंगरुळे, अमोल कानडे, करण माने, इब्राहिम शेख, वसीम शेख, प्रवीण शेळकंदे, प्रांजली काळे, पूजा कोळेकर आदींनी केली.

## देवतारी त्याला कोण मारी! 6 वर्षाच्या चिमुकल्यावर पडली विद्यूत तार पण...



यवतमाळ : नशीब बलवत्तर असेल तर मृत्यूही दोन पावलं मागे सरतो ही म्हण आपण ऐकलीच असेल. असाच एक प्रकार यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील फुलसावंगी इथं घडला आहे. ११ केव्हीची तार तुटल्यामुळे एका सहा वर्षाच्या मुलाचा अपघात झाला पण मृत्यूच्या दाढेतून तो सुखरूप परतला आहे. गजानन विनायक भोजने असं 6 वर्षीय चिमुकल्याचं नाव आहे. संध्याकाळच्या सुमारास लहान मुलं खेळत असताना अचानक 11 केव्हीचा हाय होलटेजचा तार तुटली आणि चक्क गजानन जेथून जात होता त्या ठिकाणी पडला. विधुत तार तुटून जमिनीवर पडताच एकच स्फोट झाला आणि भीषण आग लागली.
याच ताराच्या तावडीत 6 वर्षीय गजानन सापडला होता, पण दैव बलवत्तर म्हणून तारांचा गुंडाळा झाला आणि गजानन जमिनीवर पडला. यावेळी काही तरुणांनी गजाननला रिंगणातून ओढून बाहेर काढलं. सुदैवाने इतक्या मोठ्या अपघातून गजानन बचावला. पण त्याचा उजव्या हातावर आणि पायावर भाजल्यामुळे गंभीर जखमा झाल्या असल्याचं सांगण्यात येत आहे.
दरम्यान, ज्या ठिकाणाहून ११ केव्हीची तार गेली आहे तिथे भरगच्च वस्ती आहे. या हायव्होलटेज विद्युत तार अनेक ठिकाणी जॉईन्ट आहेत. हायव्होलटेज विद्यूत तार अनेक ठिकाणी जॉईन्ट असल्याने हा अपघात घडल्याचे नागरिकांनकडून बोललं जात आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्क:-9594418181 / 8424989898